# नवं नातं

लेखक: डॉ. प्रशांत पाध्ये

बाबांना फोन करुन ‘त्यांचं काम पूर्ण केलं’ हे जेंव्हा सांगितलं तेंव्हाच मला हायसं वाटलं! जवळ जवळ वीस दिवस मी या कामाच्या मागे लागलो होतो.

एक दिवस दिवे लागणीच्या सुमाराला घराची बेल वाजली. खरंतर मी दिवसभराचं, मान मोडून काढणारं काम कसंबसं संपवून कंटाळून घरी आलो होतो, साधा चहा पण करुन घ्यायचा कंटाळा आला होता, बाईनं सकाळीच जेवण करुन ठेवलेलं होतं, फक्त गरम करुन घ्यायचं होतं पण या गोष्टीचाही कंटाळा आला होता. साध्या टीव्हीच्या बातम्याही ऐकू नयेत असं वाटत होतं आणि अशावेळी डोअर बेल वाजली. कसाबसा आळस झटकत उठलो, दरवाजा उघडला तर बाहेर एक वयस्कर व्यक्ती उभी होती. चेहरा पाहून तरी वाटत होतं की बहुतेक खूप लांबचा प्रवास करुन आलेली असावी! हातात एक लांब बंदांची पिशवी होती.

“सोमेश ना?” मला काही कळलं नाही, माझा प्रश्नार्थक चेहरा पाहून त्यांनी पुढे म्हटलं, “पार्वती निवास, सुरेंद्र नगर, बरोबर ना? गेला तासभर शोधत होतो तेंव्हा कुठे सापडलं! आता सापडलं नसतं तर मात्र रात्र रस्त्यावरच काढावी लागली असती. रात्रीचं विशेष दिसत नाही, मोतीबिंदू आहे ना! वर्षांपूर्वीच डॉक्टरांनी सांगितलं पण ऑपरेशनला पैसे पडतात रे, हे पैशांचं सोंग कसं आणायचं? तू सोमेशच ना? ”

“ हो, बरोबर पत्त्यावर आलाय, या आत या, बसा जरा पंख्याखाली, ही मुंबई आहे उकडून जीव जातो नुसता!”

“ होय रे बाबा, नुसता घामाघूम झालोय बघ. आमच्याकडे असं नाही, भरपूर वारा आणि मोकळी हवा! ”

“ पाणी थंड चालेल की साधं देऊ? ”

“ साधंच दे बाबा, थंड पाण्याची सवय नाही ना! हां, ही तुझ्या बाबांनी चिठ्ठी दिलीय, मला म्हणाला, सोमेशला दे, तो तुझं काम केल्याशिवाय राहणार नाही! मला माझ्या मुलाची शंभर टक्के खात्री आहे! तुझे बाबा म्हणजे माझा खास मित्र हे सांगायलाच विसरलो. ” त्यांना साधं पाणी दिलं, चहा टाकला आणि मी ती चिठ्ठी घेतली.

“ सोमेश, हा माझा खास मित्र रघुवीर, गावात लहानपणापासून एकत्रच मोठे झालो. याच्या मुलाच्या स्कुटरचा काही वर्षांपूर्वी ॲक्सिडेंट झाला आणि तो तिथल्या तिथेच निधन पावला. पोलिसांनी दारु पिऊन गाडी चालवणाऱ्या दोघांना अटक करुन खटला घातला. कोर्टाने त्यांना शिक्षा दिली आणि दंड पण केला, शिवाय इन्शुरन्स कंपनीने पण पैसे देऊ केले पण या जिद्दी रघुने ते पैसे नाकारले का तर, ‘मुलाच्या मृत्यूच्या पैशावर कसं जगायचं’ या तत्वापायी! आज इतक्या वर्षांनी त्याला त्याची चूक उमजली आहे, कुठूनही पैसे मिळण्याची शक्यता नाही, उपाशी मरायची पाळी आली आहे. बायको आजारी असते, याला रात्री दिसत नाही शिवाय दोघांनाही ब्लडप्रेशरचा त्रास आहे, औषधांसाठीही पैसे नाहीत. मग औषधं घेतली जात नाहीत आणि त्रास आणखीन वाढतो. मी त्याला म्हटलं, सोमेश मुंबईला आहे, फक्त एकदा त्याला भेट, तो तुझं सगळं काम करुन देईल, तो पैसे मिळवून देईल. तर बाळा, रघुला मदत कर आणि माझी लाज राख. ”

मी चिठ्ठी परत त्या गृहस्थांकडे दिली. त्यांना चहा दिला आणि आराम करायला सांगितलं. नंतर जेवण गरम करुन वाढलं, बिचारे भुकेलेले होते पटापट जेवले! मी लगेचच त्यांना अंथरुण घालून दिलं आणि तो दमलेला जीव क्षणांत गाढ झोपी गेला! काही वेळानं मीही झोपलो. सकाळी माझ्या आधी ते उठलेले होते, त्यांची एका बाजूला योगासनं चालली होती! मी चहा केला तेवढ्यात जेवण करणारी बाई आली, नाश्ता केला आणि दुपारचं जेवणही तयार करु लागली. दरम्यान मी काही फोन केले.

“ काका, तुम्ही थोडा वेळ आराम करा, इथे आंघोळीचं सामान ठेवलं आहे, उशिरा आंघोळ केलीत तरी चालेल, मी जरा बाहेर जाऊन येतो, दोन तीन तास लागतील. कदाचित उशिरही होईल, वाट बघू नका, तुम्ही जेवून घ्या, रमाबाई सगळं जेवण तयार करुन ठेवतील.” मी बाहेर पडलो, जाताना आठवणीने त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो, कोर्टाच्या निकालाची प्रत, इन्शुरन्स कंपनीचे कागद, सगळं बरोबर घेतलं. कुणाला माहित काय काय मागितलं जाईल? एक दोन मित्रांना फोन केले, या प्रकरणात काय काय करावं लागतं, कुणाला भेटायला हवं ते

विचारलं, एका वकील मित्राचा कायदेशीर सल्लाही घेतला आणि मगच सरकारी ऑफिसचा उंबरठा ओलांडला! दुपारी दोन वाजता परत आलो तर हे गृहस्थ जेवणाची ताटांची वगैरे मांडणी करुन माझी वाट बघत बसलेले होते!

" काका, मी सांगितलं होतं ना तुम्ही जेवून घ्या, मला उशीर होईल, कशाला उपाशी राहिलात?"

" अरे, दोन दोन दिवस उपाशी रहायची सवय असलेल्या माणसाला दोन तासांनी काय फरक पडणार आहे?" ते हसत हसत बोलले पण त्यातली दुःखाची किनार मला दिसल्याशिवाय राहिली नाही! मी हसून वातावरण लाईट करण्याचा प्रयत्न केला. जेवणं झाली मग त्यांना आराम करायला सांगितलं आणि मी परत बाहेर पडलो. निरनिराळ्या दोन तीन ऑफिसांच्या चकरा मारल्या, प्रत्येक ठिकाणी 'हे जुनं प्रकरण आहे आता याचा काय संबंध? एकदा नाकारल्यावर तो क्लेम परत कसा करता येईल? दहा वर्षांनंतर क्लेम करता येत नाही' वगैरे उत्तरं ऐकावी लागली. माझ्या वकील मित्रानं या सर्व गोष्टींची आगाऊ कल्पना दिली असल्यामुळे मी माझ्या रागावर ताबा ठेवू शकलो. प्रत्येक ठिकाणी 'बाबा रे, तू शहाणा, मला अक्कल नाही!' असं पडखाऊ धोरण स्वीकारत पण आपलं म्हणणं पुढे रेटत राहिलो. संध्याकाळी पन्नास टक्केच आशा बाळगत घरी आलो पण घरी मात्र त्या काकांना सांगितलं, "काका, मुळीच काळजी करु नका, काम होईल, जरा वेळ लागेल पण नक्की होईल! उद्या तुम्हाला मी बसने घरी पाठवतो, काम झालं की कळवतो. " रात्री ते शांतपणे जेवले, कोणतरी आपला प्रश्न धसाला लावतोय याचं त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळीच मी त्यांना बसमध्ये बसवून दिलं आणि जातांना सांगितलं, "बाबांना निरोप द्या की काम होईल, मी सर्व प्रयत्न करतोय, काम झालं की नंतरच फोन करतो. " मी त्यांना माझा मोबाईल नंबर दिला, ते समाधानानं बसमध्ये बसले आणि अगदी गाडी दिसेनाशी होईपर्यंत खिडकीतून हात करत राहिलो! सहज तोंडावरुन हात फिरवला तर डोळ्यातून, मला फसवून काही अश्रू ओघळलेच होते हे जाणवलं!

मी ठरवलं की काम पूर्ण होईपर्यंत बाबांना फोन करायचा नाही. त्यानंतर मी जिथे जिथे बोलणी केली होती तिथे तिथे सातत्यानं फोनवरुन विचारणा करत राहिलो. मला माहित होतं की पैसे द्यायची वेळ आली की टेबलावरुन पेपर्स पुढं सरकत नाहीत, आणि जितकी रक्कम मोठी तेवढा जास्त वेळ लागतो! दहा दिवस झाले तरी काहीच हालचाल होईना, मी बेचैन व्हायला लागलो. मनात आलं आपण तर नुसते पैसे मिळवून द्यायचा प्रयत्न करतो आहोत मग ज्यांचे हे पैसे आहेत आणि त्यांना ते मिळत नाहीत म्हटल्यावर त्यांना किती त्रास होत असेल! मला त्यांच्या हालअपेष्टांची जाणीव टोचू लागली, दिवसरात्र मी फक्त त्या पैशांचाच विचार करु लागलो. मी बाबांना फोन करायचं टाळत होतो, काय उत्तर देणार होतो त्यांना? त्यांना तर मी शंभर टक्के काम करणारच याची खात्री होती आणि इथे एक टक्कासुद्धा झालं नव्हतं!

शेवटी ठरवलं आठवडाभर रजा घ्यायची पण हा प्रश्न मार्गी लावायचाच! प्रत्येक ऑफिसमध्ये चकरा मारायला सुरुवात केली. आधी ज्यांच्याशी बोललो होतो त्यांच्या टेबलासमोर ठिय्या मारुन बसायला लागलो. 'तो माणूस दुर्लक्षं करतोय, अपमान करतोय' हे कळूनही मी माझ्या वागण्यावर ठाम राहिलो! तीन चार दिवसांत याचा परिणाम दिसू लागला. लाजेखातर का होईना एक एक जण बोलू लागला, काय केल्यावर हे पैसे मिळवता येतील ते सांगू लागला आणि मी त्याप्रमाणे पावलं उचलू लागलो. शेवटी 'पैसे मिळतील' हे मुख्य ऑफिसरनं आश्वासन दिलं आणि दहा दिवसांनी यायला सांगितलं.

मी बरोब्बर दहाव्या दिवशी त्या ऑफिसर समोर हजर झालो तर तो म्हणाला "तुम्ही कशाला आलायत?"

"का, काही प्रॉब्लेम झाला काय? मला सांगा काही आणखीन कागदपत्रांची गरज आहे काय? " तर तो माणूस मोठमोठ्यानं हसायलाच लागला.

"अहो, कसलेही कागदपत्र नकोत, त्यांचे पैसे ऑनलाईन ट्रान्सफर झालेत त्यांच्या अकाऊंटमध्ये!" माझा विश्वासच बसत नव्हता, मी ओळखलं की हा माणूस मला कटवतोय! माझ्या चेहऱ्यावरचे अविश्वासाचे भाव पाहिल्यावर मात्र त्याने त्याच्यासमोरच्या लॅपटॉपचं तोंड माझ्याकडे फिरवलं आणि पैसे काकांच्या अकाऊंटमध्ये गेल्याचा पुरावाच दिला! मला इतकं भरुन आलं की तो समोरचा स्क्रिन आणि तो माणूस दिसेनासाच झाला! मी उठलो, त्या माणसाचे हात घट्ट दाबले आणि तिथून तडक निघालो, साधं 'थँक्स' म्हणायचं पण भान मला राहिलं नाही!

मी सरळ फुटपाथवर आलो, तिथल्या बसस्टॉपच्या बाकड्यावर बसलो. काही क्षणांनी भानावर आलो. परत त्या ऑफिसात गेलो त्या ऑफिसरला 'थँक्स' म्हटलं आणि त्याच्या चेहऱ्यावरच्या आश्चर्याच्या भावांकडे दुर्लक्षं करत परत बसस्टॉपच्या बाकावर बसलो! काही क्षण तसेच शांततेत गेले आणि नंतर मी शांतपणे खिशातून फोन काढला.

"बाबा, मी बोलतोय, तुमच्या मित्राचं काम झालंय, पैसे त्यांच्या खात्यात जमा झाले आहेत, व्याजासकट! पंचवीस लाखांच्यावर रक्कम ट्रान्सफर झालीय. तुम्ही मित्राला दिलेला शब्द पुरा केलाय, शंभर टक्के! अच्छा, काकांना नमस्कार सांगा! "

"सोमेश, एक मिनिट, मला सांग तुझा आवाज असा वेगळा का येतोय? बरं नाहियेे काय? " मी बराच वेळ गप्प बसलो. "सोमेश, ऐकू येतंय काय? फोन कट झाला की काय? नाही, चालूच आहे बहुतेक, सोमेश, अरे, ऐकू येतंय काय?"

"हो, येतंय, बाबा, सॉरी, पण मी सोमेश नाही! त्या दिवशी तुमचे मित्र दमून भागून अंधार पडायच्यावेळी आले होते माझ्या पत्त्यावर पण विचारत होते तुमच्या मुलाचा पत्ता! माझ्या लक्षांत आलं की तुमचा मुलगा माझ्या घरापासून जवळ जवळ तीन ते चार किलोमीटर अंतरावर रहातोय. आता अशावेळी मी त्यांना रात्रीचं कसं पाठवणार होतो तुमच्या मुलाचा पत्ता शोधायला? म्हणून मीच सोमेश आहे असं भासवून त्यांना थांबवून घेतलं, तुमचं पत्र वाचलं आणि त्या भल्या गृहस्थाला मदत करायचं ठरवलं! मला तुमचा तुमच्या मुलावर असलेला विश्वासही मोडायचा नव्हता. म्हणून मी इतके दिवस, काम होईपर्यंत तुम्हाला फोन केला नव्हता. आता काम झालं आहे, तुमचा मित्र आणि तुम्ही दोघंही खुश झाला असाल, तुमचा तुमच्या मुलावरचा विश्वासही वृद्धिंगत झाला असेल! खरंतर मी फोन केला नसता तरी चाललं असतं, तुम्हाला तुमच्या मित्राकडून पैसे मिळाले म्हणून कळलंच असतं पण मलाच कुठेतरी तुम्हां भल्या माणसांना फसवल्याची रुखरुख लागून राहिली असती! "

" तुझं नाव काय? "

" अरविंद नेने! "

" अरविंद, आज मला आणखीन एक मुलगा मिळाला आहे, खरंच, मीच धन्य झालो आहे, बाबा तर म्हणतोच आहेस, पण मला तुला खरंच भेटावसं वाटतंय. जमल्यास तुझ्या वडिलांना बरोबर घेऊन ये, त्यांनाही कळू दे की त्यांचा मुलगा खरंच कसा सुपुत्र आहे! "

"बाबा, माझे वडील जाऊन आता जवळ जवळ सहा वर्ष झाली आहेत...."

" अरे, तर मग लवकरात लवकर ये, मला माझ्या मुलाला
भेटायची खूप उत्सुकता आहे तशी तुलाही तुझ्या या बाबांना भेटायची उत्सुकता असेलच ना!"

" हो, येईन, अच्छा, काळजी घ्या! " मी भरल्या डोळ्यांनी आणि थरथरत्या हातानी फोन ठेवला!